# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी प्राचार्य / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक / महाविद्यालये व परिसंस्थेतील विभागप्रमुख यांच्या निवडणुकीसाठी सादर करावयाचे उमेदवारी अर्जाचा ([नामनिर्देशन पत्र] [(Nomination Paper]) नमूना.**

## जाहिर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये १० प्राचार्य, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये १० महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक आणि कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर, कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे ०२ अध्यापक विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये प्रत्येक अभ्यासमंडळावर ०३ महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांची निवडणूक दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी घेण्यात येणार आहे. सदर निवडणुकीसाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ९ नुसार विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी निवडणूक सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या निवडणूक सूचनेनुसार सदर निवडणुकीसाठी प्राचार्य, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांना गुरुवार, दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज नामनिर्देशन पत्र (Nomination Paper) सादर करण्यासाठी मुदत देण्यात आलेली आहे.

या प्रकटनासोबत उक्त नमूद सर्व गटांच्या उमेदवारांसाठी सादर करावयाच्या उमेदवारी अर्जाचा नमूना माहितीसाठी जोडलेला आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. : साफुपुविनि/ ३४९
दिनांक :२९ /१२/२०१७

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

**प्रत** : सर्व संबंधित.

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Notifiacation.docx